‘‘परधान आदिवासी जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन’’

विशेष संदर्भ : किनवट तालुका

प्रस्तावना (*Introduction*) :—

किनवट तालुका हा महाराष्ट्रातील आदिवासी दुर्गम तालुका आहे. या तालुक्यामध्ये प्रामुख्याने **गोंड, परधान, आंध, भिल्ल व कोलाम** या आदिवासी जमातींचे लोक वास्तव्य करतात. किनवट तालुक्यातील आदिवासी जामातीत परधान या आदिवासी जमातीचा लोकसंख्येनुसार तीसरा क्रमांक लागतो. किनवट तालुक्यात एकूण आदिवासी लोकसंख्येच्या **२६.६४** टक्के परधान आदिवासींची लोकसंख्या आहे. आधूनिक काळातसुध्दा परधान ही आदिवासी जमात सामाजिक समस्ये बरोबरच शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्येसारख्या अनेक गंभीर समस्यांनी ग्रासलेली आहे. स्वातंत्रोत्तर काळात विविध आदिवासी कल्याण कार्यक्रमांतर्गत परधान आदिवासी जमातीच्या समस्यांचे निर्मुलन करण्याचे अथक प्रयत्न शासनामार्फत सुरु असुनसूध्दा तालुक्यातील परधान आदिवासी जमाती आधूनिक सुधारणापासून वंचित आहेत. आजही ते प्रारंभिक अवस्थेतील जीवन जगत आहेत.

परधान आदिवासी जमातीतील बहुतांश समस्या हया **शैक्षणिक मागासलेपणा** मुळे निर्माण झाल्या आहेत. या शिवाय परधान आदिवासी जमातीच्या समस्यांना सामाजिक व आरोग्यविषयक अशा विविध छटा आहेत. तालुक्यातील परधान आदिवासी जमातीने अदयापही आधुनिक जीवन पध्दतीचा पुर्ण स्विकार केलेला नाही. त्यामुळे त्यांची अवस्था थोडीशी त्रिशंकुसारखी झाली आहे. सर्व आदिवासी जमातींच्या जीवनपध्दतीमध्ये कमी अधिक प्रमाणात विविधता आहे, म्हणून परधान आदिवासी जामतीचा स्वतंत्रपणे शास्त्रशुध्द अध्ययन केल्याशिवाय या जमातीच्या समस्यां समजू शकणार नाहीत.

परधान या आदिवासींच्या सामाजिक,शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे आकलन करण्यासाठी वस्तुनिष्ठपणे त्यांच्या समस्यांचे अध्ययन प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल.

२. विषयाचे महत्व (*Importance of the Subject*):—

आजही किनवट तालुक्यातील परधान आदिवासी आधुनिक सुधारणांपासून वंचित राहून पारंपारीक पध्दतीने मुक्त आणि स्वच्छंदी जीवन जगत आहेत. सदाफुलीसारखी नेहमी हसणारी,

बहरणारी,पाने–फुले, पशु–पक्षी यावर अत्यंतिक प्रेम करणारी अनेक समस्यांनी ग्रस्त असूनही दरिद्री आणि कष्टमय परिस्थितीत परधान आदिवासी जमात किनवट तालुक्यातील दुर्गम,अतिदुर्गम आणि डोंगराळ भागांत आपले जीवन जगत आहे. वेळोवेळी येणाऱ्या रोगराईवर वैद्यकीय उपचार न करता आजही अंधश्रध्देने,गंडे–दोरे,भगत,मांत्रिक यांच्यामार्फत उपचार करुण घेणारी, न्यायसंस्थेकडे न जाता आपआपसातील तंटे,भांडणे जात पंचायतीमार्फत सोडविणारे,व्यसनाधिनता कर्जबाजारीपणा,बेरोजगारी,निरक्षरता,अस्वच्छ राहणीमान यांसारख्या अनेक समस्यांनी तालुक्यातील परधान आदिवासी जनता ग्रासलेली सर्वत्र दिसते.

किनवट तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी इ.स. **२०११ च्या जनगणनेनुसार** आदिवासींची लोकसंख्या ७१८९३ एवढी आहे आणि एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी **१७०००** एवढी लोकसंख्या ही परधान आदिवासी जमातीची आहे. म्हणजेच एकूण आदिवासी लोकसंख्येच्या **२३.६४** टक्के एवढी लोकसंख्या ही परधान आदिवासी जमातीची आहे. एकुण १९१ गावांपैकी जवळपास ७ गावे ही संपुर्ण आदिवासी लोकसंख्या असणारी आहेत. या तालुक्यात गोंड,परधान,आंध या आदिवासी जमातीची लोकसंख्या सर्वाधिक आहे. परधान आदिवासी जमातीच्या कांही प्रमुख समस्या पुढील प्रमाणे आहेत.

सामाजिक समस्या :–

किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातीमध्ये आजही अनेक अंधश्रध्दा प्रचलित आहेत. त्यामुळे अनेक अनर्थ घडून परधान आदिवासी जमातीची प्रगती खुंटली आहे. **अंधश्रध्दा ही तालुक्यातील परधान आदिवासींच्या आर्थिक उन्नतीमधील प्रमुख अडसर आहे.** भानामती, करणी, शकुन–अपशकून, जादू–टोणा, मंत्र–तंत्र, विविध प्राणीमात्रांचा बळी देणे इत्यादीसारख्या अनेक अंधश्रध्दा या भागात आढळून येतात. या तालुक्यातील परधान आदिवासी जमातीमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे बालविवाह आणि वधूमूल्य (हुंडापध्दती) यासारख्या सामाजिक समस्यांनी या भागातील आदिवासी ग्रस्त आहेत.

शिक्षणाचा अभाव, व्यसनाधिनता आणि हालाखीची आर्थिक परिस्थिती यामुळे या भागातील परधान आदिवासी जमातीचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.

शैक्षणिक समस्या :—

शैक्षणिक दृष्टीकोणातून ग्रामिण आणि शहरी भागाचा तुलनात्मक अध्ययन केल्यास खूप मोठी तफावत दिसून येते. परधान आदिवासी जमातींच्या अनेक घरामध्ये दोनवेळचे पोटभर जेवण मिळविण्यासाठी प्रत्येक व्यक्तींने काम करणे आवश्यक असते. **‘भुख’** या नैसर्गिक गरजेच्या पुर्ततेसाठी त्यांचे शिक्षणाकडे आपोआपच दुर्लक्ष होते. **निरक्षरता आणि भाषेची अडचण** या प्रमुख बाबींमुळे परधान आदिवासी जमात शिक्षणापासून वंचित आहे. परंतू शासनाच्या आश्रमशाळा आणि निवासी वसतीगृहे यांसारख्या विविध शैक्षणिक योजनांमुळे परधान आदिवासी जमातीमधील शैक्षणिक समस्येंचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. तरीसुध्दा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलींचे प्रमाण अल्प असल्याचे आढळते. परधान आदिवासी जमातीमध्ये मुलांच्या घरी शैक्षणिक वातावरण नसल्यामुळे आणि पालकाच्या निरक्षरतेमुळे अदयापही शिक्षण या मुलभूत गरजेकडे दुर्लक्ष झाले आहे.

आरोग्यविषयक समस्या :—

सकस आहाराअभावी तालुक्यातील दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील परधान आदिवासी जमातींमध्ये अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. अस्वच्छ राहणीमान, शुध्द पाण्याचा अभाव यामुळे काविळ, नारु, कॉलरा यासारख्या संसर्गजण्य रोगांना परधान आदिवासी जमात नेहमीच बळी पडते. तसेच किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातीच्या बालकांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते. आदिवासी क्षेत्रांमध्ये कार्यकरणारे डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, अपुरी आरोग्यकेंद्र आणि आधुनिक वैदयकीय मदतीस अंधश्रध्देमुळे परधान आदिवासी जमातींकडून मिळणारा अपुरा प्रतिसाद यांसारख्या अनेक प्रमुख कारणांमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे वरील प्रमुख समस्या किनवट सारख्या आदिवासी तालुक्यात आढळतात. तालुक्यातील अनेक परधान आदिवासी या समस्यांनी कमी अधिक प्रमाणात ग्रस्त असल्यामुळे ते आधुनिक समाजासोबत प्रगतीच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दुर आहेत. तसेच शासनाने परधान आदिवासी जमातीच्या विकासाकरीता अनेक योजना राबवुनसुध्दा त्यांचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही. त्यामुळे परधान आदिवासी जमातीच्या समस्यांच्या मुळाशी जाऊन त्यांचे सखोल अध्ययन करणे गरजेचे आहे. याद्वारे समस्यांचा अभ्यास करुन त्याची

कारणे व त्यावरील उपाय योजना शोधण्यासाठी आणि यासारख्या अनेक उपयुक्त बाबींचे सखोल अध्ययन करण्याकरीता प्रस्तुत विषयाची संशोधन कार्यासाठी निवड केली आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टये (*Objective of Research*):—

किनवट तालुक्यातील दुर्गम आणि अतिदुर्गम भागात राहणाऱ्या परधान या आदिवासी जमातीच्या समाजजीवनाचे सखोल अध्ययन करुन त्यांना जीवन जगत असतांना निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचा शोध घेणे हे संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टये आहे. त्याच बरोबर सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, यांसारखी अनेक उद्दिष्टय संशोधनासाठी निश्चित केली आहेत. थोडक्यात परधान आदिवासी जमातीच्या सर्वांगीन विकासाच्या प्रगतीस अडथळा निर्माण करणाऱ्या विविध समस्यांचे सखोल अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे. त्यानुसार संशोधन कार्याचे पुढील प्रमाणे उद्दीष्टये निश्चित केली आहेत.

I. किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातींच्या समाजजीवनाचे अध्ययन करणे.
II. परधान आदिवासी जमातीच्या सामाजीक समस्यांचे अध्ययन करणे.
III. परधान आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्यांचे स्वरुप आणि समस्यांना कारणीभूत ठरणाऱ्या विविध घटकांचे सखोल अध्ययन करणे.
IV. परधान आदिवासी जमातींच्या आरोग्यविषयक समस्यांचे अध्ययन करुन समस्यांना कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे अध्ययन करणे.
V. परधान आदिवासी जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांचे अध्ययन करणे.
VI. किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातींच्या विकासाच्या सद्यस्थितीचे अवलोकन करुन विकासास बाधक ठरणाऱ्या विकासात्मक समस्यांचे सखोल अध्ययन करणे.

अशा प्रकारे तालुक्यातील आदिवासींना वरील समस्याव्यतिरीक्त भेडसावित असणाऱ्या इतर समस्यांची कारणमिमांसा करुन समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध प्रभावी उपाय योजना सुचविणे.

४. गृहीत कृत्ये (*Hypothesis*) :—

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील प्रमुख गृहीत कृत्ये निश्चित केले आहेत.

I. किनवट तालुक्यातील परधान ही आदिवासी जमात विविध समस्यांनी ग्रासलेली असल्यामुळे अविकसीत आहे.

II. अंधश्रध्दा, व्यसनाधितना यांसारख्या प्रमुख सामाजिक समस्यांचा विपरीत परिणाम परधान आदिवासी जमातीच्या प्रगतीवर झाला आहे.

III. आदिवासी भागात शिक्षणामधील गळतीच्या सर्वाधिक प्रमाणामुळे त्यांच्या शैक्षणिक विकासाचा वेग कमी आहे.

IV. सकस आहाराचा अभाव, वैद्यकीय सुविधांची कमतरता यांसारख्या प्रमुख कारणांमुळे परधान आदिवासी जमातीमध्ये आरोग्यविषयक समस्या वृध्दींगत होत असलेली दिसून येते.

V. परधान या आदिवासी जमातीतील शेतकरी पारंपारीक पध्दतीने शेती करीत असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होत नाही.

VI. शासनाने विविध विकासात्मक योजना राबवून सुध्दा किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातीचा सर्वांगिन विकास झालेला नाही.

५. अध्ययन क्षेत्र :—

प्रस्तुत संशोधनासाठी अध्ययनक्षेत्र म्हणून किनवट तालुक्याची निवड करण्यांत आली आहे. किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातींच्या सामाजिक,शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे सखोल अध्ययन प्रस्तुत संशोधनात केले जाईल.

६. सैध्दांतिक दृष्टिकोन :—

प्रस्तुत विषयांचे शोधकार्य करताना संशोधनाची उद्दिष्टे व गृहितकृत्ये यामधील सहसंबंध लक्षात घेवून संरचनात्मक कार्यवाही दृष्टिकोन, सामाजिक परिवर्तनाचे विविध सिद्धांत, लोकान्वय पद्धती आदि सिद्धांताचे अध्ययन करण्यात येईल व प्रस्तुत सिद्धांताचा अन्वयार्थ अध्ययन विषयांशी पडताळण्याचा प्रयत्न संशोधकाद्वारे होईल.

७. नमूना निवड (*Sampling Design*) :—

प्रस्तुत संशोधनासाठी नमूना निवड करत असतांना सहेतुक नमूना निवड पध्दतीचा वापर केला जाईल. नमूना निवड करीत असतांना किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमाती असलेल्या गावांची निवड लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन केली जाईल. लॉटरी पध्दतीने निवडलेल्या गावांतून सहेतुक नमूना निवड पध्दतीचा अवलंब करुन २०० एककांचा अभ्यास केला जाईल. त्यासाठी मुलाखत, अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा वापर करण्यांत येईल. अध्ययन विषयाची व्याप्ती व महत्व लक्षात घेवून व्यष्टी अध्ययन तंत्राचाही आधार घेतला जाईल.

८. संशोधन आराखडा (*Design of Research*) :—

किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातींच्या विविध समस्यांचे संशोधनात्मक अध्ययन करित असतांना अन्वेषणात्मक, परिचयात्मक संशोधन आराखडयाचा तसेच, निदानात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यांत येईल.

९. तथ्य संकलन पध्दती (*Method of Data collection*) :—

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुयम स्त्रोत या दोन साधनांचा वापर करण्यांत येईल.

I. **प्राथमिक स्त्रोत** — संशोधन विश्व व नमुन्याची निवड, मुलाखत, अनुसूची, निरिक्षण पध्दतीचा अवलंब करण्यांत येईल.

II. **द्वितीय स्त्रोत** — विविध लेखकांची आदिवासींच्या समस्यांवर लिहीलेली पुस्तके—वेळोवेळी प्रकाशित होणारे शासकीय साहित्य—वर्तमानपत्रातील वृत्त या विषयावर झालेले संशोधन साहित्याचा अवलंब केला जाईल.

१०. प्रकरणांची रचना (*Scheme of Chapeters*) :—

प्रस्तुत संशोधनासाठी प्रकरणांची रचना पुढील प्रमाणे केली जाईल.

१. प्रस्तावना (*Introduction*) :—

किनवट तालुक्यातील आदिवासी भागाची माहिती — परधान आदिवासी जमातीचा पुर्वइतिहास—राहणीमान—सामाजिकसमस्या—शैक्षणिकसमस्या—आरोग्यविषयकसमस्या—समस्यांच्या कारणांची कारणमिमांसा करण्यांत येईल.

२. संशोधन पध्दती (*Research Methodology*) :—

किनवट तालुक्यातील परधान आदिवासी जमातीच्या विविध समस्यांची संशोधनात्मक अध्ययन करीत असताना अन्वेशनात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडयाचा तसेच निदानात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यांत येईल. परधान आदिवासी जमातीच्या समस्यांची माहिती आणि आकडेवारी पुढील पध्दतीने संकलीत केली जाईल.

I. प्राथमिक स्त्रोत :—

संशोधन विश्व आणि नमुन्याची निवड—मुलाखत—निरिक्षकपध्दती ई.

II. द्वितीय स्त्रोत :—

विविध लेखकांची आदिवासींच्या समस्यांवर लिहिलेली पुस्तके—वेळोवेळी प्रकाशित होणारे शासकीय साहित्य—विविध मासिके—विशेषांक—प्रकाशीत साहित्य—दुर्मिळ ग्रंथरचना आदींचाही उपयोग करण्यांत येणार आहे.

किनवट तालुक्याची माहिती :—

तालुक्याची भौगोलिक रचना—परधान आदिवासींची लोकसंख्या—तालुक्यांचे प्रमुख पिके व इतर कृषिविषयक माहिती सहकारी संस्थेची माहिती—रस्ते व दळणवळण बाबत माहिती.

३. परधान आदिवासी जमाती व सामाजिक समस्या—

प्रस्तावना—प्रमुख सामाजिक समस्या,व्यसनाधिनता—अंधश्रध्दा—सामाजिकजीवन—विवाह पध्दती—समस्यांना कारणीभूत असणारे विविध घटक.

४. परधान आदिवासी जमात शैक्षणिक समस्या—

प्रस्तावना—आर्थिककारण—निरक्षरता—भाषेचीअडचण—शैक्षणिक उदासिनता—गळतीचे प्रमाण अधिक—समस्यांना कारणीभूत असणारे विविध घटक आदिंचे अध्ययन केले जाईल.

५. परधान आदिवासी जमाती व आरोग्यविषयक समस्या—

प्रस्तावना—परधान आदिवासी जमातीचा आहार—कुपोषणाची समस्या—आरोग्यविषयक अज्ञान—शासनाचे आरोग्यविषयक धोरण—आरोग्यविषयक समस्येस जबाबदार असणारे विविध घटकांचा अभ्यास करण्यांत येईल.

६. निष्कर्ष, सुचना व शिफारशी—

या प्रकरणांत परधान आदिवासी जमातीचा थोडक्यात आढावा घेवून समस्यांची कारणमिमांसा करुन विविध निष्कर्ष काढण्यांत येईल. अनेक समस्यांची सोडवणुक करण्यासाठी विविध उपाय—योजना प्रस्तुत संशोधनात सुचविण्यांत येतील.

परिशिष्टये :—

१. मुलाखत अनुसूची
२. छायाचित्रे

संदर्भग्रंथ सुची

१. साळुंके, संजय, *'आदिवासी समाजशास्त्र'*, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
२. गारे,गोविंद,(१९९३),*'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती'*, अमृत प्रकाशन, औरंगाबाद.
३. काळदाते, सुधा, *'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या'* विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
४. नाडगोंडे, गुरुनाथ, *'भारतीय आदिवासी'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५. देशमुख, सुदर्शन,*'आदिवासी समाजाचे दारिद्रय'*, निर्मल प्रकाशन, नांदेड.
६. साळुंके, संजय, *'गोंड'*, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद.
७. गायकवाड, एस. पी.', *'मुख्य सामाजिक संस्था आणि समस्या'*, अरुणा प्रकाशन, लातूर.
८. घाटगे, जयंत,*'समकालीन भारतातील सामाजिक समस्या'*, सकाळ प्रिटींग प्रेस, कोल्हापूर.
९. आगलावे, प्रदिप,*'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'*, विद्या प्रकाशन, नांदेड.

१०.बोधनकर, सुधीर, व इतर *'सामाजिक संशोधन पध्दती,'* श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

११. गारे, गोविंद (१९९७) *'आदिवासींचे शिक्षण',* साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

१२. माने, लक्ष्मण (१९९४) *'विमुक्तायन! महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास',* यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई.

संशोधक

आरमाळकर अपर्णा विश्वनाथराव

समाजशास्त्र विभाग

सरस्वती विद्यामंदीर महाविद्यालय,

किनवट

मार्गदर्शक

डॉ. बिभीषण करे

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय,

नांदेड.

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील समाजशास्त्र या विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी

सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

‘‘परधान आदिवासी जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन’’ विशेष संदर्भ : किनवट तालुका

संशोधक

आरमाळकर अपर्णा विश्वनाथराव

समाजशास्त्र विभाग

सरस्वती विद्यामंदीर महाविद्यालय,

किनवट.

मार्गदर्शक

डॉ.बिभीषण करे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय,

नांदेड.

मार्च - २०१८

1. Atal Yogesh (1965) *Advasi Bharat,Delhi*

2. Bitle Andre (1977) *The Defination of Tribal, Conficting in Romesh Thapar, Caste and Religion, Mac Millan Co.Delhi*

3. Bose N.K.(1971) *Trible Life in Indis, Government*

4. Haimendorf C.V.F.(1948) *Raj Gonds of Adilabad, Macmillan, Londo*

5. Haimendorf C.V.F.(1948) *Changing Economics and social condition Among the Gonds of Andhra Pradesh in sing K.S.(ed) Economics of the Trible and their Transformation, Concept Publishing Co. New Delhi.*

6. Hers H.S.J.(1953) *Studies in Proto-Indo Mediterrancin Culture: Indian Historical Research.*

7. Jain Navin Chandra and T.Robin (ed) (1995) *An Overview of Trible Researck Studies, Tribal Reseach and Training Institute, Pune*

8. Mathur S.S.(1966) *A Sociological Approach to Indian Education, Vinod Pustak Mandir,Agra*

9. Naik T.B.(1968) *What is a Trible ? Conficting definitions in L.P.*

Vidyarthey(ed)

10. Resseil R.V.(1916) — *Tribes and Castes of the central Provinces of India, Rajdhani Book*

11. Singh K.S.(1984) — *A Study in State Formation Tribal Communities in R.S.Sharma and V.Jha*

12. Singh K.S.(1985) — *Tribal Society in India An Anthropo-Historical Perspective Monohar Book Service,New Delhi*

13. Dr.G.M.Kulkarni — *The Problems of Tribal Development*

14. सिकळीगर पी.सी.(1994) — वन एवम आदिवासी सामाजिक जीवन, शिवा पब्लिशर्स, उदयपुर

15. भांडारकर पु.ल. — समाजिक संशोधन पध्दती

16. डॉ.गोरे गोविंद — महाराष्ट्ातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित आदिवासी जमाती.

17. डॉ.गोरे गोविंद (1993) — भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद

18. डॉ.गोरे गोविंद (1997) — आदिवासींचे शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

19. माने लक्ष्मण (1994) — विमुक्तायन! महाराष्ट्ातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई.

20. मांडवकर भाऊ (1966) — कोलाम, सेवा प्रकाशन, अमरावती

21. नाडगोंडे गुरुनाथ (1979) भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
22. लोटे रा.ज. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
23. डॉ.साळुंके संजय भा. गोंड

स्वातंत्र्यो त्र्य